# बांधकामांसाठी ‘आरे’चे रान मोकळे

## ४०७ एकरवर इमारती बांधा, प्रकल्प उभारा : सुप्रीम कोर्टाचा हिरवा कंदील

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आरे कॉलनीतील जंगल वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या पर्यावरणवाद्यांना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मोठा धक्का दिला.वादग्रस्त आरे कॉलनीतील तब्बल ४०७ एकर हरित पट्ट्यावर मेट्रोचे कार शेड, इमारतींचे बांधकाम तसेच इतर प्रकल्पांची उभारणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण मिश्रा आणि न्यायमूर्ती अब्दुल नाझिर यांच्या खंडपीठाने हिरवा कंदील दिला. यासंदर्भात राष्ट्रीय हरित लवादाच्या निकालाविरोधातील वनशक्ती या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेली याचिका फेटाळून लावल्याने या चळवळीची मोठी पिछेहाट झाली असली तरी या निर्णयाला आव्हान देण्याचे वनशक्तीने ठरवले आहे.

वनशक्ती संस्थेची याचिका फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने मुंबई शहरातील मेट्रो प्रकल्पाची निकड अधोरेखित केली. मुंबई हे दाटीवाटीचे शहर आहे. या शहरात मेट्रो प्रकल्प महत्त्वाचेच आहेत, असे महत्वपूर्ण मत न्या.



मिश्रा आणि न्या. नाझिर यांच्या खंडपीठाने व्यक्त केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे मेट्रो कार शेडबरोबरच अनेक मोठे प्रकल्प मार्गी लागणार आहेत. आरे कॉलनीतील ९० एकरहून अधिक भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प उभारले जाणार आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून जवळपास ८० हजार लोकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला असला तरी पर्यावरणवादी या निर्णयाला आव्हान देणार आहेत.